महाराष्ट्र शासन
**संचालक**
**मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, कृ.आ. म.रा. पुणे-1**
**दूरध्वनी क्रमांक- 02026122611 फॅकस क्र.02026055322 ई-मेल-** jdasoil@rediffmail.com

---

## गतिमान पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम- सन 2017-18
## (राज्यस्तर-गतिमान व डी.पी.डी.सी. जिल्हास्तर योजना)
## मार्गदर्शक सूचना

कृषि विकासाचा दर 4 टक्के करणे अभिप्रेत असून त्यासाठी केंद्र/राज्य शासनाने केलेल्या अनेक उपाययोजनेत मृद व जलसंधारण योजनेस महत्व देण्यात आलेले आहे. या अनुषंगाने राज्य शासनाने शासन निर्णय क्र. असक-2007/प्र.क्र.121/जल-7 दि. 30.11.2007 नुसार राज्यातील अपूर्ण पाणलोट गतिमान पध्दतीने पूर्ण करण्यासाठी एक धडक मोहीम हाती घेवून " गतिमान पाणलोट " विकास कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यास मान्यता दिलेली आहे. सदर कार्यक्रमाचे सनियंत्रण करणा-या सुकाणू समितीने सन 2007-08 ते सन 2016-17 पर्यंत एकूण 8949 सुक्ष्म पाणलोटांना मान्यता दिलेली आहे. सन 2017-18 मध्ये सदर कार्यक्रम राबविण्यास शासनाची मान्यता आहे. योजना अंमलबजावणीसाठीच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीच्या मार्गदर्शक सूचना खालीलप्रमाणे आहेत.

### 1) पाणलोट निवड

अ) सुकाणू समितीने आतापर्यंत मान्यता दिलेल्या पाणलोटांच्या जिल्हानिहाय मंजूर यादया आपले विभागास/जिल्हयास यापूर्वीच पाठविण्यात आलेल्या आहेत. सुकाणू समितीने मान्यता दिलेल्या पाणलोटांपैकी अपूर्ण असलेल्या पाणलोटांची जिल्हास्तरावर

छाननी करावी व जास्तीत जास्त पूर्ण झालेल्या पाणलोटांची उतरत्या क्रमाने यादी करावी. मुळ पाणलोटांत किती रकमेची कामे व क्षेत्र घेतले आहे आणि शिल्लक कामे व क्षेत्र याचा ताळमेळ घालण्यात यावा. एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमाच्या सुधारित डी.पी.आर. परिपत्रकाप्रमाणे प्रस्ताव तयार करावा. पाणलोट प्रस्तावित करतांना प्रथमत: जास्तीत जास्त टक्केवारी पूर्ण असलेला पाणलोट निधीसाठी प्रस्तावित करावा जेणे करुन प्राप्त होणा-या निधीमधून सदरचा पाणलोट पूर्ण होवू शकेल.

सन 2017-18 मध्ये जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत आदिवासी उपयोजना, आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना, विशेष घटक योजना, डीपीडीसी जिल्हास्तर व गतिमान राज्यस्तर या योजनेअंतर्गत उपलब्ध होणा-या निधीतून जास्तीत जास्त अपूर्ण पाणलोट पूर्ण करण्याचे जिल्हास्तरावर नियोजन करावे. राज्य शासनाच्या महत्वाकांक्षी जलयुक्त शिवार अभियानाअंतर्गत निवडलेल्या गावातील पाणलोटांना प्रथम प्राधान्याने निधी उपलब्ध करुन घेण्यात यावा. शासन पत्र क्र. गपावि-2015/प्र.क्र. 119/जल-7 दि. 30.4.2015 अन्वये जलयुक्त शिवार अभियानाअंतर्गत निवडलेल्या गावातील पाणलोटांबाबत सुकाणू समितीच्या मंजूरीची अट शिथील करण्यात आलेली आहे. अशा पाणलोटांना सुकाणू समितीची कार्योत्तर मान्यता घेण्यासाठी प्रस्ताव संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी आयुक्तालयास सादर करावेत.

ब) सन 2017-18 या आर्थिक वर्षात राज्यस्तर गतिमान योजनेखाली रु. 2500.00 लाख इतका निधी अर्थसंकल्पीत करण्यात आलेला आहे. तसेच सन 2017-18 या आर्थिक वर्षात डी.पी.डी.सी. जिल्हास्तर योजनेखाली प्रत्येक जिल्हयासाठी निधी अर्थसंकल्पीत करण्यात आलेला आहे.

क) राज्यस्तर-गतिमान या योजनेतून उपलब्ध होणारा निधी सुकाणू समितीने मंजूरी दिलेल्या व जलयुक्त शिवार अभियानाअंतर्गत निवडलेल्या गावांमध्ये जास्तीत जास्त क्षेत्र उपचाराच्या कामावर खर्च करण्यात यावा. तसेच जिल्हास्तर डी.पी.डी.सी. योजनेअंतर्गत उपलब्ध होणारा निधी सुध्दा पाणलोट पूर्ण करण्यासाठी, सुकाणू समितीने मंजूरी दिलेल्या व जलयुक्त शिवार योजनेतील मंजूर गावात मृद व जलसंधारण कामावर खर्च करणेत यावा.

ड) सदर योजनेतून मृद व जलसंधारणाचे खालील उपचार घेण्यात यावेत.

**क्षेत्र उपचार** :- सलग समतल चर, खोल सलग समतल चर, लुज बोल्डर, ढाळीचे बांध, कंपार्टमेंट बंडींग, शेततळे, मजगी, जुनी भात शेती दुरुस्ती इ.

**नाला उपचार:-** लहान माती नालाबांध, अनघड दगडांचे बांध, माती नालाबांध, सिमेंट नालाबांध, वळण बंधारे इ.

**2) अंमलबजावणी**

अ) या योजनेची अंमलबजावणी करतांना जलसंधारण विभागाचा दि. 10/10/2013 व दि. 15/10/2013 रोजीच्या शासन निर्णयानुसार मृद संधारण उपचारांसाठी निश्चित केलेले आर्थिक मापदंड विचारात घ्यावेत.

ब) जिल्हा सर्वसाधारण योजनेच्या अनुषंगाने शासन पत्र क्र. असक--2008/प्र.क्र.64/जल-11 दि. 7/2/2009 नुसार आयुक्तालयाचे पत्र क्र. मृदस/मृद-4/गपाविका/निधी/583/2009 दि. 24/2/2009 अन्वये दिलेल्या सुचनेनुसार सुकाणू

समितीने मान्यता दिलेल्या पाणलोटातील कामांवर मा. जिल्हाधिकारी यांची प्रशासकीय मान्यता घेवूनच कामे करावीत.

मा. जिल्हाधिकारी यांच्या प्रशासकीय मान्यतेनंतर पाणलोटातील प्रस्तावित क्षेत्र उपचाराच्या बाबींसाठी जागा निवड, सर्वेक्षण करणे, अंदाजपत्रक तयार करणे, अंदाजपत्रकास मंजूरी देणे, प्रत्यक्ष कामाची अंमलबजावणी करणे या सर्व बाबी मृद संधारण विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकातील सुचनांनुसार अंमलात आणाव्यात. ओघळ नियंत्रणाच्या माती नालाबांधाच्या व सिमेंट नालाबांधाच्या जागांची निवड अनुक्रमे तालुका कृषि अधिकारी व उपविभिागीय कृषि अधिकारी यांनीच करणे अनिवार्य करण्यात येत आहे.

क) या योजनेच्या सर्व निधी स्त्रोतातून मृद व जलसंधारणाची रु. 3.00 लाख किंवा त्यापेक्षा अधिक रकमेची कामे करतांना ई-निविदा कार्यप्रणालीचा अवलंब करण्यात यावा. यासाठी कृषि आुक्तालयाने निर्गमित केलेल्या परिपत्र क्र. मृदस/मृद-6/ई-निविदा/1060/2015 दि. 25/5/2015 अन्वये व त्यानंतर या प्रकरणी आयुक्तालय स्तरावरुन वेळोवेळी दिलेल्या सूचनांचा अवलंब करावा.

**3) निधीची उपलब्धता**

अ) कार्यक्रम राबविण्यासाठी येणारा खर्च सन 2017-18 मध्ये मंजूर केलेल्या निधीतून भागविण्यात यावा. यासाठी जिल्हयातील निवडलेल्या सर्व पाणलोटांसाठी आवश्यक रक्कम प्रथम निश्चित करावी. त्यानंतर सन 2017-18 या आर्थिक वर्षासाठी जिल्हयास राज्य योजनांतर्गत व जिल्हानियोजन समितीकडून जिल्हास्तर योजनेच्या उपलब्ध करुन देण्यात

आलेल्या निधीचे पाणलोट निहाय नियोजन करण्यात यावे. राज्यस्तर गतिमान योजनेअंतर्गत निधीची मागणी त्वरीत करण्यात यावी म्हणजे सदर योजनेअंतर्गत निधी मागणी शासनास सादर करण्यात येईल. जिल्हास्तर डी.पी.डी.सी. योजनेअंतर्गत शासन स्तरावरुन जिल्हानिहाय मंजूर निधीचे प्रपत्र सोबत सहपत्रित करण्यात आले आहे.

ब) डीपीडीसी सर्वसाधारण योजनेच्या अनुषंगाने शासनाने जिल्हाधिकारी यांना पाठविलेल्या पत्र क्र. असक/2008/प्र.क्र. 64/जल-11 दि. 7.2.2009 अन्वये पाणलोट प्रकल्पनिहाय निधी मंजूर करण्याबाबत सूचना दिल्या असून सदरच पत्राची प्रत आपणांसही पृष्ठांकित केलेली आहे. त्याअनुषंगाने आयुक्तालयाचे पत्र क्र. मृदस/मृद-4/गपाविका/निधी/583/09 दि. 24.02.2009 अन्वये आपणांस सविस्तर सूचना दिलेल्या आहेतच. त्यानुसार सदर योजनेअंतर्गत सुकाणू समितीच्या मान्यतेचे पाणलोट निवडून मा. जिल्हाधिकारी यांचेकडे प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करावेत. त्यामधील पाणलोट हे जलयुक्त शिवार योजनेत निवडलेल्या गावातील असावेत.

**4) कामाचे सनियंत्रण**

सुकाणू समितीने मंजूरी दिलेल्या पाणलोटातील प्रस्तावित कामे पूर्ण करण्याची जबाबदारी उपविभागीय कृषि अधिकारी यांची राहील. मात्र जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी हे नियंत्रण अधिकारी म्हणून काम पाहतील. यासाठी उपविभागीय कृषि अधिकारी यांना प्रत्येक पंधरवडयात किमान एक वेळ गतिमान पाणलोटास भेट देवून कामाचे नियोजन आणि सुरु असलेल्या कामांची गुणवत्ता तपासणी अनिवार्य करण्यात येत आहे. त्यांच्या भेटीची टिपणी त्यांनी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना त्वरीत सादर करावी. निवडलेल्या पाणलोटातील कामाच्या नियोजन, गुणवत्ता व उपयोगिता याबाबत आलेल्या

तक्रारींची जबाबदारी उपविभागीय कृषि अधिकारी यांचेवर राहील याची त्यांना जाणीव करुन देण्यात येत आहे. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली उपविभागीय कृषि अधिकारी यांच्यामार्फत योजनेची अंमलबजावणी करण्यात यावी. या योजनेच्या सर्व निधी स्त्रोतातील मृद संधारणाच्या कामाची तपासणी पर्यवेक्षकीय अधिका-यांनी आयुक्तालयाचे परिपत्रक क्र. मृदस/मृद-तपासणी/1214/2012 पुणे दि. 11.5.2012 अन्वये वेळच्या वेळी करावी.

**5) कामाचा आढावा**

या योजनेच्या कामाचा आढावा जिल्हास्तरावरील जिल्हा पाणलोट विकास समितीमार्फत दरमहा घेण्यात येईल.

**6) प्रगती अहवाल**

या योजनेचा पाण्लोटनिहाय भौतिक/आर्थिक साध्याचा प्रगती अहवाल उपविभागीय कृषि अधिकारी यांनी दरमहा 5 तारखेस जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयास सादर करावा. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयाने 7 तारखेस विभागीय कृषि सहसंचालक यांना सादर करावा. विभागीय कृषि सहसंचालक कार्यालयाने संकलीत पाणलोट निहाय अहवाल दरमहा 10 तारखेस कृषि आयुक्तालयास सादर करावा. या योजनेच्या सर्व निधी स्त्रोतातून पूर्ण झालेल्या कामांचा तपशील कृषि विभागाच्या (mahaagri.gov.in) या संकेतस्थळावर पाणलोट प्रकल्पासाठी (monitoring & evalution) या नावाने लिंक केलेल्या प्रणालीवर दरमहा नियमितपणे भरण्यात यावा. अन्यत: या योजनेचा पुढील निधी वितरीत केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

## 7) इतर

अ) मुद्दा क्र. 2 मधील परिच्छेद-2 मधील माती व सिमेंट नालाबांधाच्या जागा निवडीची जबाबदारी वगळता सर्व स्तरावरील सर्व अधिकारी/कर्मचारी यांना नेमून दिलेल्या तांत्रिक, वित्तीय व प्रशासकीय जबाबदा-या व कर्तव्ये प्रचलीत पध्दतीप्रमाणेच राहतील.

ब) सुकाणू समितीने मान्यता दिलेल्या पाणलोटात फेरबदल करावे लागणार नाहीत, अथवा अशा पाणलोटांचा मंजूर निधी/योजनानिहाय खर्च करावयाचा निधी यामध्ये फेरबदल करण्याची वेळ येणार नाही याची दक्षता घ्यावी.

क) या कामाची दखल प्रत्येक स्तरावरील अधिकारी/कर्मचारी यांचे गोपनीय अभिलेख लिहीतांना घेण्यात यावी.

ड) सन 2007-08 ते 2016-17 पर्यंत जिल्हयातील सुकाणू समितीने मान्यता दिलेल्या पाणलोटांपैकी स्थानिक परिस्थितीनुसार आय.डब्ल्यू.एम.पी., आर.आय.डी.एफ. या योजनांमध्ये वर्ग केलेल्या पाणलोटांचा तपशील या कार्यालयास तात्काळ कळविण्यात यावा.

इ) आतापर्यंत पूर्ण झालेल्या पाणलोटांचा अहवाल तात्काळ आयुक्तालयास सादर करावा.

ई) या कार्यक्रमांतर्गत प्राप्त झालेला निधी याच आर्थिक वर्षात खर्च करणे बंधनकारक राहील.

उ) डी.पी.डी.सी. जिल्हास्तर योजनेअंतर्गत मा. जिल्हाधिकारी यांनी प्रशासकीय मान्यता दिलेल्या कामांची गाव/गटनिहाय मंजूर यादी आयुक्तालयास सादर करावी.

**स्वाक्षरीत/-**

**संचालक**

**मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन**

**कृषि आयुक्तालय म.रा. पुणे-411001**

---------------------------------॥।---------------------------------------------------

जा.क्र.मृदस/गपाविका/मा.सू.-2017-18/1624/मृद-4/2017
मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन
कृषि आयुक्तालय, म.रा. पुणे-1 दि.29/8/2017

**प्रति,**

1) **विभागीय कृषि सहसंचालक (सर्व)**
2) **जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व)**

**स्वाक्षरीत/-**

**संचालक**

**मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन**

**कृषि आयुक्तालय म.रा. पुणे-411001**

**प्रत:- मा. प्रधान सचिव, जलसंधारण, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय मुंबई-32 यांना माहितीस्तव सादर**

**प्रत:- मा. जिल्हाधिकारी (सर्व) यांना माहितीस्तव सादर.**

**प्रत:- आयुक्त कक्ष, कृषि आयुक्तालय, म.रा. पुणे-1**